## <u>फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २९९ प्रमाणे पुरावा</u>

नि.फौ.ख.क्र. ६२/२००१

सरकार –वि– शब्बीर खान

नि.क्र.२३

## <u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०४ यांची जबानी</u>

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव — जानराव उखर्डा माठे,

वय. ८२ वर्षे, व्यवसाय – शेती,

राहणार – जाडसुळ, ता. शेगाव, जिल्हा – बुलडाणा.

**<u>सरतपासणी सरकार तर्फे श्रीमती एस. व्ही. इंगळे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.</u>**

१. माझी आडसुळ येथे शेती असून त्याचे क्षेत्रफळ ९२ आर आहे. दि.२७.१२.१९९९ रोजी मी कोठे व कोणासोबत गेलो होते हे आता मला आठवत नाही. डिगांबर माठे माझे चुलत भाऊ आहेत. या प्रकरणातील घटनेबद्दल मला काही आठवत नाही. **<u>साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने सरकारी अभियोक्ता यांच्या विनंती वरुन उलट तपासणी करण्याची परवानगी देण्यात येत आहे</u>. <u>उलट तपासणी अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता यांच्यामार्फत</u> :–**

२. हे म्हणणे खरे आहे की, दि.२७.१२.१९९९ रोजी माझे चुलत भाऊ डिगांबर माठे यांच्यासोबत मी बुलडाणा जिल्हा सहकारी संस्था मर्यादीत शेगाव येथे कामानिमित्त गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी बँकेत असतांना एक इसमाने मला पेन मागितला होता. हे म्हणणे खरे आहे की, तुम्ही बँकेचे खातेदार आहा का असे विचारल्यानंतर मी त्याला पेन दिला. हे म्हणणे खरे आहे की, त्या इसमाने सुध्दा तुम्ही बँकेचे खातेदार आहा का याबाबत मला विचारणा केली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्या इसमाने एक धनादेश व खाते उघडण्याची स्लीप मला दाखविली होती. हे म्हणणे खरे आहे की, खाते उघडण्याच्या स्लीपवर सही करण्यास मला त्या इसमाने सांगितले होते व त्यामुळे मी त्या स्लीपवर सही केली. हे म्हणणे खरे आहे की, बँकेतील काम झाल्यानंतर मी माझ्या चुलत भावासोबत गावी परत गेलो.

३. हे म्हणणे खरे आहे की, दि.२८.१२.१९९९ रोजी बँकेचे व्यवस्थापक भाऊराव झाडे माझ्या घरी आले होते. हे म्हणणे खरे आहे की, दि.२७.१२.१९९९ रोजी तुम्ही ज्या व्यक्तीस ओळख दिली होती तो व्यक्ती राजाराम अजन झाडे नसून शब्बीर खान

असल्याचे बँकेच्या व्यवस्थापकाने मला सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, बँकेच्या व्यवस्थापकांनी शब्बीर खान याच्या विरोधात रिपोर्ट दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, शब्बीर खान याने खरेदी विक्री संघ, शेगाव येथील खोट्या सह्या करुन चेक आणला होता. हे म्हणणे खरे आहे की, बुलडाणा जिल्हा सहकारी बँक, शेगाव येथे आरोपीने खोट्या नावाने खाते उघडून १३,१९०/– रुपये काढले होते व बँकेची फसवणुक केली होती. आता मला शब्बीर खान याने दिलेला राजाराम असन झाडे याचा सहीचा नमुना दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर शब्बीर खानचा फोटो आहे. सहीच्या नमुन्याच्या अर्जाला **वस्तुचिन्ह–अ** देण्यात येते. आता मला शब्बीर खान याने खाते उघडण्यासाठीचा अर्जाची छायांकीत प्रत दाखविण्यात आली. त्यावर माझी साक्षीदार म्हणून सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **वस्तुचिन्ह–ब** देण्यात येते. हे म्हणणे खरे नाही की, मी आज आरोपीला बघितले तर ओळखु शकतो. हे म्हणणे खरे नाही की, घटनेला बरेच वर्ष झाल्यामुळे मी आरोपीला ओळखु शकत नसल्याचे खोटे सांगितलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला शिक्षेपासून वाचविण्यासाठी मी आरोपीला ओळखु शकत नसल्याचे खोटे सांगितले आहे.

**सरतपास संपला.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| ( एन. डी. मेश्राम ) | ( एन. डी. मेश्राम ) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि.२३.०२.२०२६ | दि.२३.०२.२०२६ |